स.फौ.ख.क्र. 3/7768/26
सरकार वि. मुकेश
निशाणी क्र. 1

## आरोपी विरुध्दचा गुन्हयाचा सार

१. अपराध घडल्याचा दिनांक - 07/2/26

२. अहवालाचा किंवा फिर्यादीची दिनांक - 07/2/26

३. फिर्यादरांचे नाव - महाराष्ट्र शासन तर्फे,
धंतोली पोलीस स्टेशन,
नागपूर.

४. आरोपीचे नाव व पत्ता - मुकेश मुंशीलालप्रसाद विश्वकर्मा
वय 23 वर्षे, धंदा- चालक
रा. मुलगंज म.प्र.

५. अपराधाचा तपशीलः सार्वजनिक रस्त्यावर बेदरकपणे वाहन चालविले त्यायोगे तुम्ही भारतीय न्याय संहिता कलम २८१ या अंतर्गत शिक्षेस पात्र असलेला अपराध केला आणि याद्वारे मी असे निर्देश देतो की, उक्त आरोपाबाबत तुमची न्यायचौकशी करण्यात यावी.

दिनांकः

## आरोपीची जबानी

प्रश्न १. तुम्हाला दोषारोप पत्राची नक्कल मिळाली काय?
उत्तर . होय.
प्रश्न २. तुम्हाला दोषारोप पत्रातील मजकुर वाचुन समजावून सांगितला तो तुम्हाला समजला काय?
उत्तर. होय.
प्रश्न ३. तुम्हाला सरकारतर्फे वकील पाहिजे काय?
उत्तर. नाही.
प्रश्न ४. तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय?
उत्तर. होय.

मुकेश
**आरोपीची सही.**

2-5-26
**(के. एन.मराठे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, नागपूर

दिनांकः 02/05/26

## न्यायनिर्णय

१. सदर आरोपीविरुध्द प्रस्तुत खटला हा कलम भारतीय न्याय संहिता कलम २८१ अंतर्गत दाखल करण्यात आला आहे.

२. सदर प्रकरणात आरोपी याने त्याच्या स्वईच्छीने गुन्हा कबुल केला आहे. सदर गुन्हयाची कबूली नंतरचे परिणाम या न्यायालयाने त्यास स्वतः समजावून सांगितले, परंतु तो स्वतःहून गुन्हा कबूलीच्या निर्णयास ठाम राहिल्यामुळे त्याची कबूली मान्य करण्यात आली. यावरुन मी असे निर्णय करीत आहे की आरोपी कलम भारतीय न्याय संहिता कलम २८१ अन्वये गुन्हा केला आहे.

३. आरोपीस शिक्षेबद्दल विचारणेत आले. त्याने सदरचा गुन्हा प्रथम गुन्हा असल्यामुळे त्याला कमी दंड अगर शिक्षा देण्यात यावी अशी विनंती केली. सदर आरोपीचे कथन समाधानकारक असल्यामुळे व आरोपीचा हा प्रथम गुन्हा असल्यामुळे त्याला विहित शिक्षेपेक्षा कमी शिक्षा देणे योग्य आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**-आदेश-**

आरोपीस भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७५ अन्वये कलम २८१ भारतीय न्याय संहिता प्रमाणे गुन्हा केल्याने रु.१,०००/- (अक्षरी एक हजार रूपये) दंडाची शिक्षा देणेत येत आहे, दंड न भरल्यास त्यास दोन दिवसाची साध्या कैदेची शिक्षा देण्यात येत आहे.

(के. एन.मराठे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, नागपूर

दिनांकः ०२/५/२६

Report
Fine amt paid of Rs. 1000/-
vide R.No. 185/26
Dt. 02/05/2026

898
2/5/26
(Sr-Clerk)